Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 13 October 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- विजयादशमीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा –ठिकठिकाणच्या देवीमंदिरांमध्ये घटोत्थापनेनं नवरात्राची सांगता
- ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन
- माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची मुंबईत हत्या
- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर ९१ हजार आंतरवासिता संधी उपलब्ध
- नांदेडमध्ये आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महिला सशक्तिकरण मेळावा आणि
- तिसऱ्या टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा बांग्लादेशवर १३३ धावांनी विजय, मालिका तीन – शून्य अशी जिकंली.

****

विजयादशमीचा सण काल सर्वत्र उत्साहात साजरा झाला. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात माहूर इथं रेणुकादेवी मंदिर, धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथं तुळजाभवानी मंदिर, बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवी मंदिर, जालना जिल्ह्यात अंबड इथं मत्स्योदरी देवी मंदिर आणि छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरातल्या तुळजाभवानी मंदिरात घटोत्थापना होऊन नवरात्राची सांगता झाली. नागरिकांनी सायंकाळच्या सुमारास सीमोल्लंघनानंतर दर्शनासाठी मंदिरांमधून गर्दी केली होती. घरोघरी काल दसऱ्यानिमित्त सरस्वती पूजन,

शस्त्रपूजन, वाहनपूजन आदी सोहळे पार पडले. सायंकाळी रावण दहनासाठी देखील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती, विशेषत: लहान मुलांची संख्या लक्षणीय होती. साडे तीन शुभमुहूर्तापैकी एक असलेल्या कालच्या दिवशी घरखरेदी, वाहनखरेदी तसंच आभुषण खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं.

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मंदिरात आज पहाटे देवीचं सीमोल्लंघन झालं. हजारो भाविकांच्या उपस्थितीत कुंकवाची आणि फुलांची उधळण करत देवीने मंदिराभोवती पालखीतून प्रदक्षिणा पूर्ण केली आणि सीमोल्लंघन सोहळा पार पडला. यानंतर देवीची मंचकी निद्रा सुरू झाली.

****

दसऱ्यानिमित्त राज्यभरात विविध मान्यवरांनी मेळाव्यांना संबोधित केलं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या ९९ व्या स्थापना दिनानिमित्त काल सकाळी नागपूर इथं विजयादशमीच्या मुख्य कार्यक्रमाला सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांनी संबोधित केलं. वाढत्या महिला अत्याचाराबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इसरोचे माजी अध्यक्ष डॉ के. राधाकृष्णन यावेळी मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. तंत्रज्ञानानं शैक्षणिक संस्थांमध्ये बदल घडवून आणला आहे. नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल, असा विश्वास डॉ राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला.

छत्रपती संभाजीनगर इथं पंचवीस ठिकाणी सकाळी संघ स्वयंसेवकांनी शिस्तबद्धरीत्या पथसंचलन करून सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

****

शिवसेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांचे दसरा मेळावे काल मुंबईत पार पडले. आझाद मैदानावर झालेल्या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना संबोधित करतांना, लाडकी बहीण योजनेचं कौतुक केल्याबद्दल ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे आभार मानले, तसंच खरी शिवसेना आपलीच असल्याचं नमूद केलं. ते म्हणाले...

**“92 वर्षांच्या आशा ताई आपल्या सरकारचं कौतुक करतात तेव्हा शाबासकीची थाप पाठीवर पडते. आशा ताईंनी मी धन्यवाद देतो आणि म्हणून शिवसेना कुणाची तरी शिवसेना लोकांनी शिक्कामोर्तब केला. शिवसेना आपली आहे धनुष्यबाण आपल्या बाळासाहेबांचे विचार आपले दिघेसाहेबांचे विचार आपले, आणि म्हणून कोण जिंकले कोण हरले कोण पुळे गेले या सांगण्याची आवश्यकता मला नाही.”**

शिवाजी पार्क मध्ये झालेल्या मेळाव्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे संबोधित केलं. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता लागण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेल्या निर्णयांवर टीका करत, सत्तेवर आल्यास हे निर्णय रद्द करणार असल्याचं सांगितलं. ते म्हणाले…

**“यातले अनेक निर्णय रद्द केलेशिवाय मी राहणार नाही. जेजे माझ्या राज्याचेमुळे होते निर्णय जेजे तुमच्या विकासकांची बिल्डरचे, मित्रांचे जोडा करणारे निर्णय घ्या, आम्ही रद्द करून तुमच्यावरती पण गुन्हे दाखल करू. पण मी सगळ्या अधिकाऱ्यांना सांगतोय तुम्ही या पापात सहभागी होऊ नका, तुम्ही या पापात शामिल होऊ नका नाहीतर तुम्हाला तुरुंगात डाम्बल्या शिवाय राहणार नाही.”**

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आमदार पंकजा मुंडे यांनी केली आहे. संत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यातल्या सावरगाव इथं काल झालेल्या दसरा मेळाव्यात त्या बोलत होत्या. राज्यातल्या अठरापगड जाती धर्मांच्या जनतेला सोबत घेणार असल्याचं सांगत, त्यांनी सर्वांना एकत्र येण्याचं आवाहन केलं. कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित होते, संघर्षाच्या काळात आपण सर्वांनी एकत्र येऊन वज्रमूठ बांधण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

बीड जिल्ह्यातल्या शिरूर कासार तालुक्यातल्या नारायणगड इथं झालेल्या दसरा मेळाव्यात मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी समाज बांधवांना संबोधित केलं. नारायण गडाने कधीच जातीची शिकवण दिली नसून, कायम समतेचा संदेश दिला असल्याचं जरांगे यांनी सांगितलं.

****

परभणी शहरातल्या श्री शिवप्रतिष्ठान आणि विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं विजयादशमीनिमित्त काल भव्य महादौड काढण्यात आली. परभणी शहरातली ही सुमारे ४५ वर्षांची परंपरा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीनंही काल शहरात पथसंचलन करण्यात आलं.

नांदेड इथं शिख धर्मियांच्या पवित्र तख्त सचखंड हुजूर साहिब गुरुद्वारा इथून काल विजयादशमिनित्त पारंपरीक हल्लाबोल मिरवणूक काढण्यात आली. शिख बांधव मोठ्या संख्येनं यात सहभागी झाले होते.

****

६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन काल साजरा झाला. नागपूर इथं दीक्षाभूमीवर भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सामुहिक बुद्धवंदना झाली. यावेळी समता सैनिक दलाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देऊन अभिवादन केलं. यासाठी देशभरातून बौद्ध अनुयायी नागपूर इथं दाखल झाले होते.

यानिमित्त, छत्रपती संभाजीनगर इथल्या बुद्धलेणीच्या पायथ्याशी असलेल्या तथागत भगवान बुद्धांच्या मूर्तीच्या दर्शनासाठी काल बुद्ध अनुयायी मोठ्या संख्येनं दाखल झाले होते. ध्वजारोहण, धम्मदेसनासह विविध धार्मिक कार्यक्रम, अन्नदान याठिकाणी पार पडलं.

नांदेड शहरात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हजारो उपासक, उपासिकांच्या उपस्थितीत महा बुद्धवंदनेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

****

माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या झाली. बाबा सिद्दीकी यांचे पुत्र आणि आमदार झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर त्यांच्यावर तीन अज्ञातांनी गोळीबार केला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं असून त्यांची चौकशी सुरू आहे.
सिद्दीकी यांच्यावरील गोळीबाराची घटना दुर्दैवी असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. मुंबईत कोणत्याही परिस्थितीत कायदा सुव्यवस्था बिघडू नये, याची काळजी घेण्याचे निर्देश पोलिसांना दिले असून, या प्रकरणातल्या आरोपीला कठोर शिक्षा होईल, असंही त्यांनी सांगितलं. या प्रकरणाचा तपास एन्काउंटर स्पेशलिस्ट दया नायक यांच्याकडे सोपवणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

****

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर आतापर्यंत १९३ कंपन्यांनी ९१ हजार इंटर्नशिप म्हणजेच आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे पोर्टल कालपासून अर्जदारांसाठी खुलं झालं असून, अर्जदार २५ ऑक्टोबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात. कंपन्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आंतरवासिता संधीबाबत या पोर्टलवर माहिती देणार असून, यामध्ये तेल, वायू, उर्जा, पर्यटन यासारख्या विविध २४ क्षेत्रांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२४–२५ या काळात २१ ते २४ वर्षे वयोगटातल्या सव्वा लाख जणांना आंतरवासिता संधी मिळवून देण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. आंतरवासिता उमेदवाराला एका वर्षासाठी दरमहा ५ हजार रुपये तर एक रकमी अनुदान म्हणून ६ हजार रुपये दिले जाणार आहेत.

****

नांदेडमध्ये आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महिला सशक्तिकरण मेळावा होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार देखील यावेळी उपस्थित असतील.

****

भारतानं काल झालेल्या टी–ट्वेंटी क्रिकेट सामन्यात बांग्लादेशचा १३३ धावांनी पराभव केला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांची मालिका तीन – शून्य अशी जिंकली. प्रथम फलंदाजी करत भारताने संजु सॅमसनच्या शतकी खेळीच्या बळावर निर्धारित षटकात सहा बाद २९७ धावा केल्या. सॅमसननं १११ तर सूर्यकुमार यदावनं ७५ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल बांग्लादेशचा संघ २० षटकात सात बाद १६४ धावाच करु शकला. रवि बिश्नोई यानं तीन तर मयंक यादवनं दोन बळी टीपले. सामनावीरसह मालिकावीरचा किताब अष्टपैलु खेळाडू हार्दिक पांड्या याला देण्यात आला.

****

दरम्यान, महिला टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची लढत आज ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारतीय संघाला हा सामना जिंकणं आवश्यक आहे.

****

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने कर थकबाकीदार मालमत्ताधारकांसाठी विजयादशमी निमित्त विशेष सूट जाहीर केली आहे. १५ ऑक्टोबर पर्यंत मालमत्ता धारकांनी आपल्याकडील थकबाकी रक्कम एकरकमी भरल्यास त्यावरच्या व्याजावर ७५ टक्के सूट देण्यात येणार आहे.

****

नांदेड महापालिकेनेही पाणी कर शास्ती माफी योजनेला १५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ही मुदत परवा संपली होती, मात्र योजनेला मिळत असलेला प्रतिसाद पाहता ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यातल्या पारडी शिवारात काल स्थानिक गुन्हे शाखेने चौघांकडून दोन गावठी पिस्तूल आणि चार जिवंत काडतूस जप्त केले.

****

जालना शहरातल्या अंबड चौफुली भागातून अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणारा एक ट्रक पोलिसांनी काल पकडला. या ट्रकमध्ये राज्यात बंदी असलेला ५५ लाख ७५ हजार रुपये किमतीचा गुटखा आढळून आला.

****